वाचा:- संचालनालयाचे स्थायी आदेश क्रमांक ९/२०१७, दिनांक २५/०५/२०१७

---

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य
कोकण भवन, सहावा मजला
नवी मुंबई ४०० ६१४

01 OCT 2019

**स्थायी आदेश क्रमांक ०६/२०१९, दिनांक**

विषय: जिल्हा परिषद विभागांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत सुधारणा

**प्रस्तावना :-**

उपरोक्त वाचा मधील आदेशान्वये जिल्हा परिषदेच्या विभागांकरीता विभागनिहाय लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभाग आणि एकात्मिक बालविकास विभागाबाबत सद्यस्थितीत स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करण्यात येतात. लेखापरीक्षणाचे कार्यपध्दतीत सुसूत्रता आणण्याचे अनुषंगाने सदर लेखापरीक्षण अहवालांचे एकत्रिकरण करून एक अहवाल निर्गमित करणेचे अनुषंगाने खालीलप्रमाणे पूरक आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश :-**

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभाग व एकात्मिक बालविकास विभागाचे लेखापरीक्षण एकाच लेखापरीक्षण पथकाकडून करण्यात यावे व यासंदर्भात 'महिला व बालकल्याण विभाग आणि एकात्मिक बालविकास विभाग' असा एक अहवाल निर्गमित करण्यात यावा. लेखापरीक्षण अहवालात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ९ मधील उपकलम अ, ब, क व ड अन्वये आक्षेप नोंदविताना त्यात विभागनिहाय आक्षेप नोंदविण्यात यावे व क्रमवर्धी आक्षेप क्रमांक नमूद करण्यात यावे उदा.

| |
|---|
| **कलम ९ अ खालील आक्षेप** |
| अ] महिला व बालकल्याण विभाग |
| १. |
| ब] एकात्मिक बालविकास विभाग |
| २ |
| **कलम ९ ब खालील आक्षेप** |
| अ] महिला व बालकल्याण विभाग |
| ३ |
| ब] एकात्मिक बालविकास विभाग |
| ४ |

| |
|---|
| **कलम ९ क खालील आक्षेप** |
| अ] महिला व बालकल्याण विभाग |
| ५. |
| ब] एकात्मिक बालविकास विभाग |
| ६. |
| **कलम ९ ड खालील आक्षेप** |
| अ] महिला व बालकल्याण विभाग |
| ७. |
| ब] एकात्मिक बालविकास विभाग |
| ८. |

तसेच सदर लेखापरीक्षण अहवालातील भाग १ मध्ये मागील लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित लेखापरीक्षण परिच्छेदांबाबत विभागनिहाय स्वतंत्र तक्त्यात माहिती नमूद करावी.

सदर विभागांचे स्वतंत्र लेखापरीक्षणाकरीता सद्यस्थितीत वापरण्यात येणा-या श्रमदिनांचा जिल्हा सहाय्यक संचालक स्तरावर आढावा घेऊन जिल्हा परिषद लेखापरीक्षणाकरीता मंजूर एकूण श्रमदिनांच्या मर्यादेत आवश्यकतेनुसार महिला व बालकल्याण विभाग आणि एकात्मिक बालविकास विभागांचे एकत्रित लेखापरीक्षणाकरीता श्रमदिन निर्धारीत करण्यात यावे. याअनुषंगे MAINS प्रणालीत अनुषंगिक बदल करणेबाबत सहाय्यक संचालक (संगणक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांना कळविण्यात यावे.

सदर निर्देश सन २०१८-१९ चे जिल्हा परिषद लेखापरीक्षणापासून लागू राहतील.

(सु. रा. भोसले)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित

१. विभागिय सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)
२. जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)
३. सहाय्यक संचालक (संगणक), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय